Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
**416 004, MAHARASHTRA**
PHONE : EPABX – 2609000, BOS Section – 0231-2609094, 2609487
Web : www.unishivaji.ac.in Email: bos@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ४१६ ००४, महाराष्ट्र**
दूरध्वनी - इपीबीएक्स - २०६०९०००, अभ्यासमंडळे विभाग : ०२३१- २६०९०९४. २६०९४८७
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ईमेल : bos@unishivaji.ac.in


**संदर्भ क. : शिवाजी वि./अ.म./551** **दिनांक : 08/09/2025**

**प्रति,**

1. मा. प्राचार्य/संचालक,
   सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2. मा. अधिविभाग प्रमुख,
   सर्व संबंधित अधिविभाग,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार पदवी व पदव्युत्ततर पदवी अभ्यासक्रमाच्या Multiple Entry Multiple Exit (MEME) च्या नियमावलीबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2.0) नुसार पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्याने विविध टप्प्यांवर बाहेर पडावयाचे झालेस/Multiple Entry Multiple Exit (MEME) यासाठीची नियमावलीस विद्यापीठ अधिकार मंडळाने मंजुरी दिलेली आहे. सोबत सदर नियमावलीची प्रत जोडली आहे.

सदर नियमावली विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in,NEP-2020@suk (Online Syllabus) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर नियमावली सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. एस. एम. कुबल)
उपकुलसचिव

प्रत : माहितीसाठी व पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी.

| | |
|---|---|
| अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा. | पात्रता विभागास. |
| अध्यक्ष, सर्व अभ्यास व अस्थायी मंडळे. | पी.जी. सेमिनार विभागास. |
| संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ कार्यालयास. | पी.जी. प्रवेश विभागास. |
| परिक्षक नियुक्ती ए व बी विभागास. | संलग्नता टी. 1 व टी 2 विभागास. |
| दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण विभागास. | आय.क्यु.ए.सी. विभागास. |
| संगणक केंद्र/आय. टी. सेल विभागास. | सर्व ऑन परीक्षा विभागास. |

# एम. इ. एम. इ. बाबत नियम
## (Rules for Multiple Entry Multiple Exit)

1. खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे सम सत्र (Even Semester) यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास एक्झिट घेता येईल. नापास झालेल्या अथवा ए.टी.के.टी. मिळालेल्या विद्यार्थ्याला एक्झिट घेता येणार नाही. पदवीच्या प्रथम आणि द्वितीय वर्षी अनुक्रमे त्या विद्यार्थ्याने 44 आणि 88 श्रेयांकांची संपादणूक करणे बंधनकारक राहील. MEME सुविधा उपलब्ध होण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यां वैध ABC ID असणे आवश्यक आहे.

| Exit with | Min. Credits Requirement* | | | | NHEQF Level |
|---|---|---|---|---|---|
| | Humanities | Com. & Mgt. | Science& Tech. | IDS | |
| **Undergraduate Certificate** after successful completion of First Year (Two Semesters) of UG Degree Programme | 40-44 | 40-44 | 40-44 | 40-44 | 4.5 |
| **Undergraduate Diploma** after successful completion of Second Year (Four Semesters) of UG Degree Programme | 80-88 | 80-88 | 80-88 | 80-88 | 5.0 |
| **Bachelor Degree** after successful completion of Third Year (Six Semesters) of UG Degree Programme | 120-132 | 120-132 | 120-132 | 120-132 | 5.5 |
| **Bachelor Degree (Honours)** in a **Discipline** after successful completion of Four Year (Eight Semesters) of UG Degree Programme | 160-176 | 160-176 | 160-176 | 160-176 | 6.0 |
| **Bachelor Degree (Honours with Research)** in a **Discipline** after successful completion of Four Year (Eight Semesters) of UG Degree Programme | 160-176 | 160-176 | 160-176 | 160-176 | 6.0 |
| **Postgraduate Diploma** in discipline after successful completion of the First Year of Master's degree programme | 40-44 | 40-44 | 40-44 | 40-44 | 6.0 |
| **Master's Degree** in discipline after successful completion of Second Year of Master's degree programme | 80-88 | 80-88 | 80-88 | 80-88 | 6.5 |

*Details of course-wise credits are described in the later part of the Regulations.

2. बाहेर पडण्यापूर्वी चा (Exit घेण्यापूर्वी) त्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र, पदविका आणि पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणाऱ्या क्रेडिट व्यतिरिक्त जादा चार श्रेयाकांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक असेल. तो अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने मान्यता दिलेला अभ्यासक्रम असावा. कौशल्य अभ्यासकम किंवा Internship /Apprenticeship पूर्ण केल्यानंतर सदर विद्यार्थ्याला UG Certificate / UG Diploma प्रमाणपत्र प्रदान करता येईल.

3. एक्झिट घेतलेला विद्यार्थी, त्याची पदवी/पदव्युत्तर पदवी त्याच उच्च शिक्षण संस्थेत किंवा बाहेरच्या कोणत्याही मान्यताप्राप्त उच्च शिक्षण संस्थेत पूर्ण करू शकतो. पण ती पदवी/पदव्युत्तर पदवी त्याने प्रथम वर्ष प्रवेशाच्या तारखेपासून सात वर्षात पूर्ण केली पाहिजे.

4. एक्झिट घेतलेल्या विद्यार्थ्यास विषम सत्र (Odd Semester) मध्ये प्रवेश घेताना त्याचा पार्श्वप्रवेश (Lateral Entry) हा श्रेयाकांची ची वैधता आणि उच्च शिक्षण संस्थेतील प्रवेश क्षमता (Intake Capacity)यावर अवलंबून असेल.

5. ज्या सत्रानंतर एखाद्या विद्यार्थ्यास एक्झिट घ्यावयाचे असल्यास त्या सत्र समाप्तीच्या परीक्षेच्या निकालानंतर एक महिन्याच्या आत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत विद्यापीठात एक्झिट साठी अर्ज करणे आवश्यक आहे.

6. प्रमाणपत्र आणि पदविका प्राप्त करण्यासाठी आलेले अर्ज (एक्झिट साठी) विचारात घेउन संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संबंधित अधिविभागाचे विभागप्रमुख यांनी सूचना फलकावर पाच दिवस लावून ती यादी विद्यापीठांमध्ये आठ दिवसात पाठविणे बंधनकारक राहील

7. एक्झिट घेण्यापूर्वी तो विद्यार्थी आपल्या परीक्षेतील कामगिरीमध्ये सुधारणा (Improvement) करण्यासाठी प्रयत्न करू शकतो. एक्झिट घेतल्यानंतर त्या विद्यार्थ्यास परीक्षेतील कामगिरी सुधारण्यासाठी अर्ज करता येणार नाही. कामगिरी सुधारण्यासाठी विद्यापीठाची प्रचलित नियमावली लागू राहिल.

8. प्रत्येक सत्रसमाप्तीपूर्वी नोटिसद्वारे महाविद्यालयाने MEME बाबत विद्यार्थ्यांना अवगत करणे आवश्यक आहे.

9. महाविद्यालयाने राबवलेला विद्यापीठ मान्यता प्राप्त कौशल्याआधारित कोर्स किंवा दूरशिक्षण विभागामार्फत सुरू असलेला कौशल्याआधारित चार श्रेयांकाचा कोर्स यासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

10. OJT (Internship /Apprenticeship) पूर्ण करून चार श्रेयांक मिळविणा—या विद्यार्थ्यांना चार आठवड्याचे प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य राहिल.

11. प्रमाणपत्र आणि पदविका यासाठी अर्ज करणा—या विद्यार्थ्यास विद्यापीठाने निश्चित केलेले शुल्क भरणे बंधनकारक राहील. प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थ्याने पदवीदान विभागाकडे ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

12. सदर प्रमाणपत्रे त्या—त्या वेळी संबधीत महाविद्यालये/अधिविभागात प्रदान करण्यात येतील त्यासाठी पदवीदान समारंभाची आवश्यकता असणार नाही.